महाराष्ट्र शासन

# जिल्हा पुरवठा अधिकारी यांचे कार्यालय, रत्नागिरी

दुरध्वनी क्रमांकः-०२३५२-२२२४१२ ई-मेल- dso_ratnagiri@rediffmail.com

क्रमांक जिपुका/कार्या-५/राधादु/केरोसीन/जाहीरनामा/खेड/२०१७ दिनांक - २६/०७/२०१७

## जाहीरनामा

महाराष्ट्र शासन अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग यांचेकडील शासन निर्णय क्र. राभादु-१७१६/प्र.क्र.२३९/नापु ३१ दिनांक ०६ जुलै २०१७ अन्वये राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियम,२०१३ च्या कलम १२(१) (ई) मधील तरतूदीनुसार पंचायती,स्वयंसहाय्यता गट सहकारी संस्था यांसारख्या सार्वजनिक संस्थांना किंवा सार्वजनिक न्यासांना रास्तभाव दुकानांचे परवाने देण्यास प्राथम्य देणे आणि महिला किंवा त्यांच्या समुदायाव्दारे दुकानांचे व्यवस्थापन करणे. त्यानुसार सध्याची रास्तभाव दुकाने/किरकोळ करोसीन परवाने तसेच ठेवून आजमितीस रद्द असलेली व यापुढे रद्द होणारी,राजिनामा दिलेली व लोकसंख्या वाढीमुळे दयावयाची नवीन तसेच विविध कारणांमुळे भविष्यात दयावयाची नवीन रास्तभाव दुकाने व किरकोळ केरोसीन परवाने खालील प्रथम्यक्रमानुसार मंजूर करण्यात यावेत असे निर्देश देण्यात आले आहेत.

१) पंचायत ( ग्रामपंचायत व तत्सम स्थानिक स्वराज्य संस्था )
२) नोंदणीकृत स्वयसहाय्यता बचत गट
३) नोंदणीकृत सहकारी संस्था
४) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम किंवा संस्था नोंदणी अधिनियम या कायदयाच्या अंतर्गत नोंदणी झालेल्या संस्था
५) महिला स्वयंसहाय्यता बचत गट व महिलांच्या सहकारी संस्था.

शासनाच्या सदर निर्णयाच्या अनुषंगाने रास्तभाव दुकाने व किरकोळ केरोसीन परवाने मंजूर करण्याबाबत यापुढे पुढील प्रमाणे कार्यवाही करावयाची आहे.

### (१) जाहीरनामा प्रसिध्द करणे.

अ) ज्या गावात/क्षेत्रात,नवीन रास्तभाव दुकाने व किरकोळ केरोसीन परवाना मंजूर करावयाचा असेल तेथे एकाच वेळी एकत्रित जाहिरनामा प्रसिध्द करण्यात यावा.

ब) ज्या गावात/क्षेत्रात,रास्तभाव दुकान अस्तित्वांत असेल व आता फक्त किरकोळ केरोसीन परवाना मंजूर करावयाचा असेल तेथे फक्त किरकोळ केरोसीन परवाना मंजूर करण्यासाठी जाहीरनामा प्रसिध्द करण्यात यावा.

क) ज्या गावात/क्षेत्रात,किरकोळ केरोसीन परवाना अस्तित्वांत असेल व आता फक्त रास्तभाव दुकान मंजूर करावयाचे असेल तेथे फक्त रास्तभाव दुकान मंजूर करण्यासाठी जाहीरनामा प्रसिध्द करण्यात यावा.

## (२)<u>गटांकडून अर्ज मागविणे व गटाची निवड करणे.</u>

यानुसार रत्नागिरी जिल्हयातील खेड या तालुक्यातील खालील नमूद केलेली रास्तभाव दुकाने/किरकोळ केरोसीन परवाने यांचे व्यवस्थापन रिक्त आहे.

| अ.क्र. | तालुका | रास्तभाव दुकान /किरकोळ केरोसिन परवाना दुकानाचे नांव | गावाचे/क्षेत्राचे नांव | व्यवस्थापन रिक्त असल्याचे कारण | केव्हापासून रिक्त | जाहिरनामा प्रकार संयुक्त/रास्तभाव धान्य दुकान/किरकोळ केरोसीन |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | खेड | **कर्जी** | **कर्जी** | राजिनामा | २०१५ | संयुक्त |
| २ | | **धवडे** | **धवडे** | राजिनामा | २०१५ | संयुक्त |
| ३ | | **सवणस खुर्द** | **सवणस खुर्द** | राजिनामा | २०१५ | संयुक्त |
| ४ | | **तुळशी खुर्द** | **तुळशी खुर्द** | राजिनामा | २०१५ | संयुक्त |
| ५ | | **संगलट** | **संगलट** | राजिनामा | २०१५ | संयुक्त |
| ६ | | **निळीक** | **निळीक** | राजिनामा | २०१५ | संयुक्त |

त्याअर्थी वरील प्रपत्रातील स्तंभ ४ मध्ये दर्शविण्यात आलेल्या गावात/क्षेत्रात स्तंभ क्रमांक ७ मध्ये दर्शविलेप्रमाणे दुकानांसाठीचा व्यवस्थापन भरणेसाठीचा जाहिरनामा याव्दारे प्रसिध्द करण्यात येत आहे. तरी सदर जाहिरनाम्यास अनुसरुन वर दर्शविलेल्या प्राथम्यक्रमातील त्या गावातील/क्षेत्रातील पंचायत,बचतगट,सहकारी संस्था यांनी **विहीत नमुन्यामधील अर्ज आवश्यक त्या खाली दिलेल्या कागदपत्रांसह दिनांक २१/०८/२०१७ या दिवस अखेरपर्यंत आपले तालुक्याचे तहसीलदार यांचे कार्यालयात कार्यालयीन वेळेत दाखल करावेत.**

**<u>अर्जासोबत जोडावयाचे कागदपत्र/अटी व शर्ती</u>**

१) अर्जाचे कोरे नमुने रक्कम रुपये १०/- तहसीलदार कार्यालयात जमा केलेवर संबंधित तहसीलदार कार्यालयाचे पुरवठा शाखेतून उपलब्ध होतील.
२) अर्जदार हा स्तंभ ४ मध्ये दर्शविलेल्या गावातील/क्षेत्रातील असावा.
३) विहीत केलेल्या दिनांकापूर्वी प्राप्त झालेल्या अर्जांचाच छाननीसाठी विचार केला जाईल.विहीत तारखेनंतर प्राप्त झालेले अर्ज विचारात घेतले जाणार नाही.यासाठी संबंधित तहसीलदार यांनी अर्जदार यांस पोहोच देऊन अर्जावर दाखल तारीख घालावी.
४) अर्जावर संस्था प्रमुख व संस्थेचे सचिवाची सही असणे आवश्यक आहे.
५) अर्जासोबत खालील कागदपत्रांच्या साक्षांकीत प्रती जोडणे बंधनकारक आहे.

**५)(अ) अर्जदार जेव्हा ग्रामपंचायत किंवा तत्सम स्थानिक स्वराज्य संस्था असेल तेव्हा --**

१. ग्रामपंचायत/तत्सम स्थानिक स्वराज्य संस्था असेल तेव्हा ग्रामसभा/ग्रामपंचायत ठरावाची प्रत
२. सर्व सदस्यांचे निवडून आल्याबाबतचे प्रमाणपत्राची झेरॉक्स प्रत,त्यांचे नावाचे यादीसह.
३. ग्रामपंचायत/तत्सम स्थानिक स्वराज्य संस्था यांचे आर्थिक व्यवहार व लेखे अदयावत असलेबाबत पुरावा /बँकेचे पासबुकाची झेरॉक्स प्रत
४. ज्या ठिकाणी परवान्यानुसार दुकान चालविणार आहेत, त्या जागेच्या मालकी हक्काचा पुरावा. यात ग्रामपंचायतीकडील नमुना आठ / सातबारा उतारा / नगर भुमापन विभागाकडील मिळकतीचा उतारा इ. तसेच जागा भाड्याची असल्यास ग्रामपंचायतीचा नमुना आठ / सिटी सर्व्हेचा उतारा इ. व रूपये २००/- च्या स्टॅम्प पेपरवरील जागा मालकाचे संमतीपत्र

**५)(ब) अर्जदार जेव्हा नोंदणीकृत स्वयंसहाय्यता बचत गट,नोंदणीकृत सहकारी संस्था किंवा महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम किंवा संस्था नोंदणी अधिनियम या कायदयाच्या अंतर्गत नोंदणी झालेल्या संस्था असतील तेव्हा**

१. बचत गट,सहकारी संस्था यातील सर्व सदस्यांची यादी.
२. सहकरी कायदयाच्या अंतर्गत नोंदणी झाल्याबाबत जिल्हा उपनिबंधक यांचे प्रमाणपत्र
३. संस्थेचे आर्थिक व्यवहार व लेखे अदयावत असलेबाबत पुरावा /बँकेचे पासबुकाची झेरॉक्स प्रत
४. ज्या ठिकाणी परवान्यानुसार दुकान चालविणार आहेत, त्या जागेच्या मालकी हक्काचा पुरावा. यात ग्रामपंचायतीकडील नमुना आठ / सातबारा उतारा / नगर भुमापन विभागाकडील मिळकतीचा उतारा इ. तसेच जागा भाड्याची असल्यास ग्रामपंचायतीचा नमुना आठ / सिटी सर्व्हेचा उतारा इ. व रूपये २००/- च्या स्टॅम्प पेपरवरील जागा मालकाचे संमतीपत्र

**५)(क) अर्जदार जेव्हा महिला स्वयंसहाय्यता बचत गट व महिलांच्या सहकारी संस्था असतील तेव्हा**

१. स्वयंसहाय्यता गट अस्तित्वात व कार्यरत असल्याबाबत संबंधित प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा अथवा संबंधित गटविकास अधिकारी यांचेकडील प्रमाणपत्र.
२. स्वयंसहाय्यता गटाच्या सभासदांची यादी व शैक्षणिक पात्रता दर्शविणारा पुरावा.
३. स्वयंसहाय्यता गटाचे सभासद दारिद्रय रेषेखालील असल्याबाबतचा पुरावा.
४. स्वयंसहाय्यता गटाच्या आर्थिक व्यवहाराचे हिशेब व लेखे अद्ययावत ठेवले असल्याबाबतचा पुरावा.
५. बँकेच्या पासबुकाची छायांकीत प्रत.
६. सभासदांना वाटप केलेल्या कर्जाच्या तपशीलाच्या अनुषंगाने वसुलीबाबत सद्य:स्थिती दर्शविणारा पुरावा.
७. स्वयंसहायता गटाकडे खेळते भांडवल असलेबाबत पुरावा म्हणून मागील तीन वर्षाचे ताळेबंद पत्रक व खेळत्या भांडवलाबाबत आवश्यक कागदपत्र.
८. स्वयंसहायता गटाने / सभासदाने बँकेकडून कर्ज घेतले असल्यास, सदर कर्ज हप्ते परत फेडीबाबतच्या सद्य:स्थितीबाबतचा पुरावा.
९. स्वयंसहायता गट, ज्या ठिकाणी परवान्यानुसार दुकान चालविणार आहेत, त्या जागेच्या मालकी हक्काचा पुरावा. यात ग्रामपंचायतीकडील नमुना आठ / सातबारा उतारा / नगर भुमापन विभागाकडील मिळकतीचा उतारा इ. तसेच जागा भाड्याची असल्यास ग्रामपंचायतीचा नमुना आठ / सिटी सर्व्हेचा उतारा इ. व रूपये २००/- च्या स्टॅम्प पेपरवरील जागा मालकाचे संमतीपत्र.
१० बचत गटातील सर्व सदस्यांची यादी.

६) वरील प्राधान्यक्रमानुसार रास्तभाव व किरकोळ केरोसीन परवाने मंजूर केलेल्या दुकानांचे व्यवस्थापन महिला किंवा त्यांच्या समुदायाव्दारे करणे आवश्यक राहील. सदरचा जाहीरनामा शासन निर्णय क्र.राभादु/१७१६/प्र.क्र.२३९/नापु ३१ दिनांक ०६/०७/२०१७ मध्ये दिलेल्या अटी व शर्तींच्या अधीन राहून तसेच या कार्यालयाकडील उपलब्ध माहितीच्या आधारे प्रसिध्द करण्यात येत आहे. सदर माहितीमध्ये काही बदल झाल्यास सदरचा जाहीरनामा कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्याबाबतचे अधिकार या कार्यालयाने राखून ठेवले आहेत.

JAIKRISHNA SHRIRANGRAO PHAD
Digitally signed by JAIKRISHNA SHRIRANGRAO PHAD
Date: 2017.07.27 12:50:55 +05'30'

**( डॉ.जयकृष्ण फड )**
**जिल्हा पुरवठा अधिकारी**
**रत्नागिरी.**

**प्रत:- तहसीलदार खेड**

२/- सदरचा जाहीरनामा आपल्या मार्फत संबंधीत गावातील तलाठी कार्यालय, ग्रामपंचायत कार्यालय व विविध कार्यकारी सोसायटी कार्यालयाच्या नोटीस बोर्डावर प्रसिध्द करावा. गांव दवंडी देऊन त्यास प्रसिध्दी देण्यात यावी. तसेच सदर जाहीरनामा तहसील कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर प्रसिध्द करुन प्रसिध्दी अहवाल तात्काळ इकडे सादर करावा. तसेच अर्जाचे कोरे नमुने विहित फी घेऊन उपलब्ध करून द्यावेत. विहीत मुदतीत भरुन प्राप्त होणारे त्यावर दाखल तारीख घालून स्विकारण्यात यावेत व प्राप्त सर्व अर्जांची छाननी व चौकशी करुन सोबतच्या विहीत नमुन्यात छाननी पत्रक तयार करुन आपला प्रस्ताव स्वयंस्पष्ट अभिप्रायासह या कार्यालयात सादर करावा.

**प्रत:- गट विकास अधिकारी, पंचायत समिती,खेड, जि. रत्नागिरी.**

२/- प्रस्तूत जाहीरनाम्यास आपल्या कार्यालयाच्या नोटीस बोर्डावर प्रसिध्दी द्यावी. तसेच संबंधीत गावातील सर्व स्वयंसहाय्यता गटांना प्रस्तूत जाहीरनाम्याची माहितीसाठी एक छायाप्रत द्यावी व त्याबाबतची पोहोच सादर करण्यात यावी. वरील बाबतची जबाबदारी सर्वस्वी आपली राहील.

**प्रत:- बाल विकास प्रकल्प अधिकारी, पंचायत खेड, जि. रत्नागिरी.**

**प्रत:- उपविभागीय अधिकारी, खेड उपविभाग, जि. रत्नागिरी**

**प्रत:- उपमुख्य कार्यकारी अधिकारी (म.बा.क.), जिल्हा परिषद रत्नागिरी.**

**प्रत:-जिल्हा अभियान व्यवस्थापक,महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवन्नोती अभियान, र .जि .कृ .औद्यो. स. से. सह.संघ मर्या.रत्नागिरी यांच्या इमारतीवरील पहिला मजला, झाडगांव रत्नागिरी**

**प्रत:- महिला आर्थिक विकास महामंडळ, हिंदू कॉलनी,शिवाजी स्टेडीयमच्या मागे,रत्नागिरी.**

JAIKRISHNA SHRIRANGRAO PHAD
Digitally signed by JAIKRISHNA SHRIRANGRAO PHAD
Date: 2017.07.27 12:51:14 +05'30'

**( डॉ.जयकृष्ण फड )**
**जिल्हा पुरवठा अधिकारी**
**रत्नागिरी.**